क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/९६

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १८ ऑगस्ट, १९९९.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ३ **ऑगस्ट, १९९९ (मंगळवार)** रोजी झालेल्या ९६ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवीत आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

१८/८/९९
**सचिव**
**कार्यकारी समिती**

प्रति,
सर्व सदस्य,

**निमंत्रित** :
शासनाचे सचिव (नवि-२)
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित** :
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्रा.,

प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# ९६ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ३ ऑगस्ट, १९९९ (मंगळवार) |
| वेळ | : | दुपारी २.०० वाजता |
| सभास्थान | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयातील समिती कक्ष, ६वा मजला, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१. |

<u>उपस्थित सदस्य</u> :

| | |
|---|---|
| श्री.नारायण राणे<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री.सुरेशदादा जैन<br>गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| श्री.वसंत डावखरे<br>उपसभापती,<br>विधान परिषद | सदस्य |
| श्री.कालीदास कोळंबकर<br>नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री.हरेश्वर पाटील<br>मुंबईचे महापौर | सदस्य |
| श्री.दिगंबर कांडरकर<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.विजय म.दारुवाले<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |

| | |
|---|---|
| श्री.अरुण बोंगिरवार<br>शासनाचे मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री.के.नलिनाक्षन<br>महापालिका आयुक्त<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| डॉ.सुरेश जोशी<br>शासनाचे प्रधान सचिव<br>नगर विकास विभाग | सदस्य |
| श्री.अनिल कुमार लखिना<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | सदस्य |
| श्री.अजित वर्टी<br>महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

निमंत्रित :

श्री.रामानंद तिवारी,
शासनाचे सचिव,
नगर विकास विभाग

माननीय मुख्यमंत्री म्हणून नियुक्त झाल्यावर श्री.नारायण राणे हे प्रथमच प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून बैठकीस उपस्थित राहीले होते. त्यावेळी सदस्यांनी त्यांचे सौहार्दपूर्वक स्वागत केले.

त्यानंतर, माननीय अध्यक्षांनी, श्री.कालीदास कोळंबकर, नगर विकास राज्यमंत्री, श्री.हरेश्वर पाटील, मुंबईचे महापौर, श्री.अरुण बोंगिरवार, शासनाचे मुख्य सचिव, श्री.अजित वर्टी, महानगर आयुक्त व प्राधिकरणाचे सदस्य-सचिव, डॉ.सुरेश जोशी,

शासनाच्या नगर विकास विभागाचे प्रधान सचिव व श्री.अनिल कुमार लखिना, व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांचे प्राधिकरणाचे नवीन पदाधिष्ठीत सदस्य म्हणून आणि श्री.रामानंद तिवारी,सचिव, नगर विकास विभाग यांचे निमंत्रित म्हणून मनःपूर्वक स्वागत केले. श्री.के.नलिनाक्षन या बैठकीमध्ये महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका या नात्याने उपस्थित होते. याचाही उल्लेख माननीय अध्यक्षांनी केला,तसेच श्री. सदा सरवणकर, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका व श्री.गोविंद स्वरुप, सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग हे प्राधिकरणाचे नवीन पदाधिष्ठीत सदस्य झाल्याचा उल्लेख मा.अध्यक्षांनी केला.

माजी मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा माननीय अध्यक्षांनी त्यानंतर गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, माननीय अध्यक्षांनी श्री.रविंद्र माने, माजी नगर विकास राज्यमंत्री, श्री.नंदकुमार साटम, मुंबईचे माजी महापौर, श्री.राज पुरोहित, माजी विधानसभा सदस्य, श्री.चंद्रकांत पडवळ, माजी विधानसभा सदस्य, श्री.पी.सुब्रहमण्यम्, शासनाचे माजी मुख्य सचिव, श्री.गिरीष गोखले, माजी महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री.व्ही.पी.राजा, शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाचे माजी सचिव व श्री.अवधेश प्रसाद सिन्हा, सिडकोचे माजी व्यवस्थापकीय संचालक, यांनी प्राधिकरणाचे सदस्य म्हणून आणि श्री.नंद लाल, शासनाच्या नगर विकास विभागाचे माजी प्रधान सचिव यांनी निमंत्रित म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा मा.अध्यक्षांनी गौरवपूर्ण उल्लेख केला आहे.

प्राधिकरणाचे माजी महानगर आयुक्त श्री.रमानाथ झा व श्री.मन मोहन सिंह यांनी केलेल्या सेवेचा गौरवपूर्ण नोंद घेणारे २ टराव (जोडपत्र १ व २ पहावे) त्यानंतर संमत करण्यात आले.

खाली नमूद केलेल्या प्राधिकरणाच्या माजी सदस्यांच्या निधनाबद्दल माननीय अध्यक्षांनी त्यानंतर शोक व्यक्त केला :-

१. श्री.वि.ग.उर्फ बाळ धारप, माजी नगरसेवक व माजी अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका

२. श्री.रत्नाप्पा कुंभार, महाराष्ट्राचे माजी नगर विकास मंत्री तसेच प्राधिकरण व त्याच्या पुर्वीच्या स्थायी समितीचे माजी अध्यक्ष

३. श्री.शरद आचार्य, मुंबईचे माजी महापौर

दिवंगत श्री.धारप, श्री.कुंभार व श्री.आचार्य यांच्या निधनाबद्दल ३ ठराव प्राधिकरणाने १ मिनीट स्तब्ध उभे राहून मंजूर केले (जोडपत्र ३,४ व ५ पहावे).

त्यानंतर, विषयपत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : दिनांक २३ नोव्हेंबर,१९९८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या (९५ व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे**

१.१ कार्यवृत्तातील बाब क्र.४ च्या संदर्भात त्या वेळचे सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक, श्री.अवधेश प्रसाद सिन्हा यांनी २५ जानेवारी,१९९९ रोजी पाठविलेल्या पत्रात खालीलप्रमाणे नमूद केल्याचे बैठकीच्या निदर्शनास आणण्यात आले :-

१. कार्यवृत्ताच्या परिच्छेद ४.२ व ठराव क्र.८०६ मध्ये ६ संस्थांना कर्ज देण्यासाठी कार्यवृत्तात नमूद केल्याप्रमाणे प्राथम्य ठरविले नव्हते,

२. कार्यवृत्ताच्या परिच्छेद ४.१ (२) (४) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कमी केलेल्या व्याजाचा दर (१२ टक्के) फक्त पुढील कालावधीतील ठेवीसाठीच मंजूर केलेला नव्हता. तो अगोदरच्या मुदत संपलेल्या ठेवीसाठीही मंजूर केला होता.

१.२ यावर झालेल्या चर्चेत कार्यवृत्तातील या संदर्भातील नोंदी बरोबर आहेत असे मत सदस्यांनी व्यक्त केले. त्यामुळे त्याबाबत कोणतेही बदल करु नयेत असे ठरले.

१.३ बाब क्र.१४ च्या कार्यवृत्तातील नोंदीत (प.१ (१) - पृ.२०) सामाजिक संस्थांना द्यावयाच्या भूखंडावर बांधकाम क्षेत्राच्या जास्तीत जास्त १५% जागेचा वापर `कार्यालय व संस्थात्मक कामासाठी` करण्यास परवानगी द्यावी असा उल्लेख चुकून झाला होता त्या ऐवजी जास्तीत जास्त १५% जागेचा वापर `इतर वाणिज्यिक कार्यालयासाठी` करण्यास परवानगी देण्यात यावी असा बदल करावा असे सूचविण्यात आले.

१.४ वरील सूचना मान्य करुन सुधारित कार्यवृत्त प्राधिकरणाने पक्के केले.

**बाब क्र.२ : दिनांक २३ नोव्हेंबर, १९९८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ९५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल**

कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.३ : प्राधिकरणाचे सन १९९९-२००० चे वार्षिक कार्ये कार्यक्रम**

सन १९९९-२००० चा वार्षिक कार्ये कार्यक्रम मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८१५ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाचे कलम २३(१) अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण –

(अ) टिप्पणीसह सादर केलेला १९९९-२००० सालचा वार्षिक कार्ये कार्यक्रम, १९९९-२००० सालाचा मुंबई नागरी प्रकल्प-फिरता निधीचा वार्षिक कार्ये-कार्यक्रम आणि महानगर योजना-फिरता निधीचा (मेगासिटी योजना) वार्षिक कार्ये-कार्यक्रम यांना याद्वारे मंजूरी देत आहे; व

(ब) वार्षिक कार्ये-कार्यक्रमांत अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशिलाला मान्यता देण्यास कार्यकारी समितीला याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.४ : प्राधिकरणाचे सन १९९९-२००० चे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक**

प्राधिकरणाकडे निरनिराळी स्थानिक प्राधिकरणे व शासकीय उपक्रम कर्ज/अनुदान/ठेवी यासाठी मागणी करतात. त्या संदर्भातील माहिती बैठकीत सांगण्यात आली. त्यानंतर सन १९९९-२००० चे अर्थसंकल्पिय अंदाज मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.८१६ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३(१) याद्वारे प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरणाचा अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा १९९९-२००० सालचा अर्थसंकल्प आणि १९९८-१९९९ सालचे सुधारित अंदाज याना प्राधिकरण याद्वारे मंजूरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, १९९९-२००० च्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेला रु.८० लाख इतका भांडवली/विकास खर्चासाठी तसेच व्यवस्थापन व देखभालीपोटी करावयाच्या खर्चास आणि १९९८-१९९९

हया वर्षात वरील संस्थेस अनुदान म्हणून अदा केलेल्या रु.५० लाखाच्या खर्चास मान्यता देण्यास प्राधिकरण महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, योजना सर्वेक्षण इत्यादी कार्यक्रम अहवालात समाविष्ट न केलेल्या आणि प्रत्येकी रु.१० लाखापेक्षा अधिक व्यय नसलेल्या बाबींना मंजूरी देण्याचा आणि या मर्यादेपेक्षा अधिक व्यय नसलेला व मंजूर अर्थसंकल्पात तरतूद न केलेला कोणताही खर्च करण्याचा अधिकार, अशा प्रकरणाचा अहवाल आगामी बैठकीत प्राधिकरणाला सादर करण्याच्या अटींवर, याद्वारे कार्यकारी समितीस देत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी आणि महानगर योजना फिरता निधी यांचे अंदाजित जमा व खर्च दर्शविणारे १९९९-२००० चे अर्थसंकल्पिय अंदाज व १९९८-१९९९ चे सुधारित अंदाजास प्राधिकरण याद्वारे मंजूरी देत आहे."

**बाब क्र.५ : वांद्रे-कुर्ला संकुलातील ४५ मीटर रस्त्याला लागून असलेला एक भूखंड महानगर गॅस लिमिटेडला कॉम्प्रेस नॅचरल गॅसच्या आउटलेटसाठी देणेबाबत**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ८१७ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोटकलम (२) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनींची विल्हेवाट) विनियम, १९७७ चा नियम १६ याप्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि या बाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, वांद्रे- कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील ४५ मीटर रुंद वांद्रे-कुर्ला

गोडरस्त्यालगतचा सुमारे १२०० चौ.मी. एवढे क्षेत्र असलेल्या व ज्यावरील बांधकाम क्षेत्र हे फक्त ९६० चौ.मी. पर्यंत मर्यादित ठेवायचे आहे असा भूखंड बाब टिप्पणीच्या परिच्छेद ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या कारणासाठी महानगर गॅस लिमिटेड यांना ८० वर्ष भाडेपट्टयाने, रुपये २५,०००/- दर चौ. मी. बांधकाम क्षेत्र याप्रमाणे अधिमूल्य आकारुन, उक्त विनियमाच्या नियम ४ (३) या बाबतीत शिथिल करुन, उक्त विनियमाच्या नियम ७ प्रमाणे, तसेच उक्त विनियमाच्या अन्य अटी व शर्ती नुसार देण्यास प्राधिकरण याद्वारे कार्योत्तर मंजूरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या भूखंडाचे वाटपाबाबत प्राधिकरणाच्या मा.अध्यक्षांनी केलेल्या कार्यवाहीचे प्राधिकरण याद्वारे अनुसमर्थन करीत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, उक्त विनियमाच्या प्रपत्र "ड" (भाडेपट्टा विलेखाचा नमुना) मध्ये योग्य ते बदल करुन याबाबतीत भाडेपट्टा विलेख करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : बी.एस.ई.एस. लि.यांना वीज ग्रहण केंद्र स्थापन करण्यासाठी दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी टेक्स्ट" या गटातील भूखंडाचे वाटप करणेबाबत**

६.१ बी.एस.ई.एस.मर्यादित ही कंपनी मुंबईच्या उपनगरात विजेचा पुरवठा करते. वांद्रे-कुर्ला संकुलात त्यांना वीज पुरवठा करण्यासाठी वीजग्रहण केंद्र स्थापन करावयाचे आहे. त्यासाठी सदर कंपनीस २३०० चौरस मीटर क्षेत्रफळाचा (अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक १.००) भूखंड दर चौरस मीटर परिबध्द क्षेत्र रुपये २५,०००/- या सवलतीच्या दराने ८० वर्षाच्या भाडेपट्टयांनी देण्याबाबतचा हा प्रस्ताव होता. श्री.वसंत डावखरे, मा.सदस्य यांनी असे प्रतिपादन केले की, बी.एस.ई.एस.कंपनी यांची वीज वितरित करावयाची कमाल शक्ती ५०० मेगावॅट एवढी असताना सदर कंपनीने ग्राहकांना

पाठविलेली बिले ५११ मेगाव्हॅट वीज पुरवठा केल्याची आहेत, तसेच त्यांनी व मुंबईचे मा.महापौर यांनी असे मांडले की, सदर कंपनी मुंबई शहरात मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम, वीज वापरासाठी आकारीत असलेल्या दराच्या सुमारे दुप्पट दराने उपनगरातील ग्राहकांना वीज पुरवठा करते असे निदर्शनास आणण्यात आले. तसेच या कंपनीच्या बाबतीत ग्राहकांच्या अनेक तक्रारी आहेत असे सांगण्यात आले.

६.२ यावर विचार करुन, सदर प्रस्ताव हा वीज ग्रहण केंद्रासाठी भूखंड देण्याचा होता व भूखंड न दिल्यास वीज वाटपासंबंधीच्या तक्रारी वाढतील हे लक्षात घेऊन बाब टिप्पणीत सुचविलेला प्रस्ताव मान्य करावा आणि वीज दरातील तफावत, वीजेची देयके जास्त आकारली जातात व इतर तक्रारीबाबत सदस्यांनी जे विचार बैठकीत मांडले ते राज्य शासनाच्या निदर्शनास आणून त्यावर योग्य ती कार्यवाही करण्याची राज्य शासनास विनंती करावी असे ठरले.

६.३ त्याप्रमाणे प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८१८</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोटकलम (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ मधील नियम १६ नुसार प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी टेक्स्ट" ब्लॉकमधील २३०० चौ.मी.चा, चटई क्षेत्र निर्देशांक १.० इतका असलेला एक भूखंड, परिबध्द क्षेत्राच्या दर चौरस मीटरला रु.२५,०००/- या अधिमूल्य दराने उक्त विनियमाचा नियम ४ (३) च्या तरतूदी बाब टिप्पणीच्या प.४ मध्ये नमूद केलेल्या कारणासाठी शिथिल करुन प्रस्तावित्याप्रमाणे उक्त विनियमाच्या नियम ७

नुसार व बाब टिप्पणी सोबत जोडण्यात आलेल्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे, वीज ग्रहण केंद्राच्या बांधकामासाठी ८० वर्षाच्या भाडेपट्टा कराराने बी.एस.ई.एस. मर्यादित याना, उक्त विनियमाच्या इतर अटी व शर्तीनुसार देण्यास प्राधिकरण याद्वारे मंजूरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, बी.एस.ई.एस. मर्यादित बरोबर करण्यात येणा-या भाडेपट्टा विलेख नमुन्याच्या परिच्छेद क्र.२३ (i) (विनियमा सोबतचे प्रपत्र "ड") मध्ये बाब टिप्पणीच्या प.६ मध्ये नमूद केलेल्या कारणासाठी खालील अट समाविष्ट करण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे :-

`उपरोक्त प्रयोजनासाठी अधिमूल्याचा दर परिबध्द क्षेत्राच्या दर चौरस मीटरला रु.५०,०००/- इतका समजण्यात येईल.`

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, वरील ठराव कार्यान्वित करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याकरीता, तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ मधील प्रपत्र "ड" मध्ये दिलेल्या भाडेपट्टा विलेखाच्या नमुन्यात आवश्यक ते इतर बदल करण्यासाठी महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : अग्निशमन केंद्र बांधण्यासाठी मुंबईच्या अग्निशमन दलाला प्रस्तावित "जी टेक्स" ब्लॉक मधील ५००० चौरस मीटरचा भूखंड देणे**

वांद्रे-कुर्ला संकुलातील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्रात अग्निशमन केंद्र असणे अत्यंत जरुरीचे आहे, तसेच वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "ऎ" ब्लॉकमधील ५००० चौरस मीटर क्षेत्राची अग्निशमन केंद्राची जमीन उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेली असल्यामुळे, विषयांकीत भूखंड प्राधिकरणाने नाममात्र भाडेपट्टयाने अग्निशमन केंद्रासाठी द्यावा अशी

आग्रही विनंती महापालिका आयुक्त यांनी केली व त्यास अनेक सदस्यांनी अनुमोदनही दिले. त्यावर विचार करुन संबंधित भूखंड ठरावात नमूद केलेल्या अटी सापेक्ष वार्षिक रु.१/- च्या नाममात्र भाडयाने ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्याचे मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८१९ :-

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत ठरणा-या इतर अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी-टेक्स" ब्लॉकमधील ७५०० चौ.मीटर अनुज्ञेय परिबध्द क्षेत्र असलेला ५००० चौ.मीटरचा भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेला अग्निशमन केंद्र व निवासी संकुल बांधण्यासाठी ८० वर्षाच्या कालावधीसाठी वार्षिक रुपये १/- या नाममात्र भाडयाने उक्त विनियमाच्या अटी व शर्तीनुसार देण्यास प्राधिकरण याद्वारे खालील अटी सापेक्ष मंजूरी देत आहे :-

(१) जागेच्या पोटी राज्य शासनास द्यावयाच्या कब्जा हक्कांच्या रक्कमेचा भरणा जागेचा ताबा घेते वेळी बृहन्मुंबई महानगरपालिका प्राधिकरणास करील,

(२) संबंधित भूखंडाचा ताबा घेतल्यापासून २ वर्षात बृहन्मुंबई महानगरपालिका अग्निशमन केंद्राच्या सेवा कार्यान्वित करील. कोणत्याही कारणाने २ वर्षाच्या कालावधीत अग्निशमन केंद्राच्या सेवा कार्यान्वित न झाल्यास पण एकूण ३ वर्षाच्या आंत कार्यान्वित झाल्यास, रुपये २५,०००/- प्रति चौरस मीटर परिबध्द क्षेत्र या दराने व ३ वर्षाच्या कालावधीनंतर सदर अग्निशमन केंद्राच्या सेवा कार्यान्वित झाल्यास रुपये ५०,०००/- प्रति चौरस मीटर या दराने भूखंडाच्या अधिमूल्याची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिका प्राधिकरणास भरेल.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी आणि वाटपग्राहीशी करावयाच्या भाडेपट्टा विलेखाच्या नमुन्यात (विनियमाचे प्रपत्र "ड") मध्ये आवश्यक त्या इतर दुरुस्त्या करण्यासाठी प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

**<u>बाब क्र. ८</u> : बांद्रा-कुर्ला संकुलाच्या "अे" ब्लॉक मधील सी.टी.स.क्र.७९१ (भाग) ए या भूखंडाचा "बस आगार/टर्मिनल" या जमीन वापराऐवजी बस आगार/टर्मिनल व बेस्टसाठी तांतडीची कर्मचारी निवासस्थाने, असा बदल करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये वांद्रे-कुर्ला संकुलाच्या नियोजन प्रस्तावात फेरबदल.**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ८२० :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३ (८) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्राच्या `ए` ब्लॉकच्या मंजूर नियोजन प्रस्तावांमध्ये प्रस्ताविल्याप्रमाणे म्हणजे सिटी सर्व्हे क्र. ७९१ (भाग)-अ या भूखंडाच्या वापरामध्ये `बस आगार/टर्मिनल` या ऐवजी `बस आगार/टर्मिनल व तातडीची कर्मचारी निवासस्थाने` असा बदल करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) च्या तरतूदीनुसार फेरबदलाची कार्यपध्दती पूर्ण

करण्यासाठी आवश्यक ती पुढील कृती करण्यास प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५१(३) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे, महानगर आयुक्तांना किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेला वरिष्ठ नियोजकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिका-याला याबाबत येणा-या हरकती व सूचनांवर विचार करण्याचा आणि असे हरकती व सूचना सादर करणा-या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आपला अहवाल राज्य शासनाला सादर करण्यासाठी प्राधिकृत करीत आहे. या अहवालासोबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे अंतिम मंजूरीसाठी पाठवावयाचे प्रसतावित फेरबदल असतील."

**बाब क्र. ९ :** **कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६ अन्वये जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करण्याबाबत**

या बाबीवर विचार विमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र. १० :** **कर्जाऊ रकमेची परतफेड करण्यात कसूर करणा-या कर्जदारांना आणखी आर्थिक सहाय्य देण्यासाठी अपात्र ठरविणे**

ही बाब प्राधिकरणाच्या परवानगीने मागे घेण्यात आली.

**बाब क्र. ११ : विविध शासकीय संस्थेत/उपक्रमात गुंतविण्यात आलेल्या प्राधिकरणाच्या निधी बाबतचा अहवाल.**

११.१ प्राधिकरणाच्या अगोदरच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे प्राधिकरणाने संबंधित शासकीय संस्थाना निधी परतीचे वेळापत्रक देण्याबाबत कळविले होते. परंतु बहुतांशी संस्थानी निधी परतीचे वेळापत्रक दिलेले नाही. ही बाब प्राधिकरणाच्या निदर्शनास आणण्यात आली. या विषयावर झालेल्या चर्चेमध्ये प्राधिकरणाने शासनाकडे किंवा शासकीय उपक्रमाकडे केलेल्या गुंतवणूकी हया सर्वसाधारणपणे शासनाच्या लोककल्याणाच्या योजना/जनहिताच्या बाबी या राबविण्यासाठी जी पैशाची गरज लागते त्यासाठी केलेल्या आहेत असा उल्लेख करण्यात आला. गुंतवणूकीची रक्कम व त्यावरील व्याज वेळेवर परत मिळविण्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करावी असे सुचविण्यात आले :-

(१) ज्या शासकीय संस्था/उपक्रम ठेवीची रक्कम/व्याज वेळेवर परत करीत नाही त्यांना पैसे परत करण्याविषयी वेळापत्रक संबंधित विभागाचे सचिव हयांच्या सहमतीने १५ दिवसात देण्यास सांगावे व वेळापत्रकाप्रमाणे पैसे परत देण्याचे त्यांचेवर बंधन घालावे.

(२) दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे प्राधिकरणाचा निधी परत न केल्यास संबंधित संस्थांवर कायदेशिर कार्यवाही केली जाईल असेही त्यांना कळवावे.

(३) ज्या संस्थानी निधीची परतफेड वेळेवर केलेली नाही त्यांच्या ठेवीला मुदतवाढ देऊ नये.

(४) ज्या संस्थांनी ठेवीची रक्कम वेळेवर परत केली नाही त्यांना २% अतिरिक्त व्याज आकारण्यात यावे व ते वसूल करण्यात यावे.

११.२ व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी २% ज्यादा व्याज आकारु नये अशी विनंती केली. त्याबाबतीत त्यांनी प्राधिकरणास पत्र पाठवावे असे सांगण्यात आले.

**बाब क्र. १२ : धारावी प्रभागामधील सी.टी.एस्. क्रमांक ५३१ हया १२४२७ चौरस मीटर मोकळया जमिनीचे त्यावर प्राधिकरणाने केलेल्या कुंपण वगैरे कामासह महाराष्ट्र शासनाला जिल्हा क्रिडा संकुल विकसित करण्यासाठी पुनः हस्तांतरण (परतीकरण)**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८२१ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि हया संबंधात त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, वांद्रे-कुर्ला संकुलातील धारावी डिव्हीजन मधील १२४२७ चौरस मीटर क्षेत्र असलेली जमीन, त्यावर केलेल्या/करावयाच्या रु.३१.६२ लाखांच्या कामांसह शासनाच्या महसूल व वन विभागास, शासनाच्या क्रिडा व युवा कल्याण विभागाला जिल्हा क्रिडा संकुल विकसित करण्यासाठी, हस्तांतरीत करण्यास खालील अटींच्या अधीन राहून प्राधिकरण मान्यता देत आहे :-

(१) शासनाचा महसूल व वन विभाग प्राधिकरणाला सदरहू जमीन प्राधिकरणाच्या ताब्यात असलेल्या काळासाठी कोणतेही व्याज आकारणार नाही; आणि

(२) सदरचे हस्तांतरणास मेसर्स कावेरी कन्स्ट्रक्शन कंपनीने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेला दावा क्रमांक ओ.ओ.जे.सी-२३३३/८७ बाबत जो निर्णय येईल तो बंधनकारक राहील.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, ठराव कार्यान्वित करण्यासाठी महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र. १३</u> : गिरगांव चौपाटी ते नरिमन पॉईन्ट दरम्यानच्या समुद्र भिंतीस पोहोचलेली हानी - मजबूतीकरणासाठी उपलब्ध करावयाचा निधी - निधी उपलब्ध <u>करण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती.</u>**

विषयांकीत कामाच्या अर्ध्या खर्चाची रक्कम राज्य शासनास वेळेवर उपलब्ध करुन देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राधिकरणाने द्यावयाचे कर्जावर प्राधिकरणाने काही व्याज आकारु नये अशी विनंती महापालिका आयुक्त यांनी केली. त्यावर विचार करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेस या बाबतीत व्याज न आकारता कर्ज द्यावे व या कर्जावर १३% दराने होणारी व्याजाची रक्कम राज्य शासनाने प्राधिकरणास द्यावी अशी विनंती राज्य शासनास करावी असे ठरले. त्याप्रमाणे प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र. ८२२</u> :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, त्यांच्या दिनांक ११ जुलै, १९९७ च्या ठराव क्र.७२३ मध्ये फेरबदल करुन, गिरगांव चौपाटी ते नरिमन पॉईन्ट दरम्यानच्या समुद्रभिंतीचे मजबूतीकरण आदीपोटी येणा-या खर्चाचा १/३ ऐवजी १/२ हिस्सा मुंबई महानगर प्रदेश विकास निधीमधून खर्च करण्यास महानगर प्राधिकरण याद्वारे मंजूरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाचे कलम २१-अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन बृहन्मुंबई

महानगरपालिकेस रु.३.५० कोटीचे कर्ज व्याज न आकारता बृहन्मुंबई महानगरपालिकेस खालील अटी सापेक्ष देण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने काम पूर्ण झाल्यानंतर प्रत्येकी सहा महिन्यांच्या १० समान हप्त्याने मुद्दल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास परत करावे (प्रस्तावित बांधकाम जून, २००० मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे, त्यामुळे परतफेडीचा प्रथम हप्ता दिनांक १-१-२००१ रोजी देय होईल.),

(२) या कर्जास प्राधिकरणाच्या इतर नेहमीच्या अटी लागू रहातील.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, पुढील अटींचे अधीन राहून, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या खर्चापोटी अनुदान उपलब्ध करुन देण्याची मागणी प्राप्त होईल त्याप्रमाणे अनुदान उपलबध करुन देण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे :-

१) सदरहू कर्ज मंजूर करणे बाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून रितसर लेखी विनंती प्राप्त करावी,

२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने कर्ज मंजूरीच्या प्रस्तावास मंजूरी देवून तसा ठराव पारित करावा व त्याची प्रत प्राधिकरणास उपलब्ध करावी,

३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने शासनाच्या नगर विकास विभागाची सदरहू कर्ज प्रस्तावास मंजूरी प्राप्त करुन त्याची एक प्रत प्राधिकरणास उपलब्ध करावी,

४) उचित नमुन्यात बृहन्मुंबई महानगरपालिका व प्राधिकरण यांनी करारनामा करावा.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, या कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्ध्या हिश्याची उर्वरित रक्कम रुपये ३.५० कोटी शासनास वेळेवर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्राधिकरणाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस हे कर्ज व्याज न आकारता द्यावे ही अट मान्य केलेली असल्यामुळे त्या कर्जावरील द.सा.द.शे. १३ टक्के व्याजाची रक्कम शासनाने प्राधिकरणास द्यावी अशी विनंती राज्य शासनास करण्यात यावी व त्या बाबतीत पत्रव्यवहार व इतर कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१४ : विधानभवनाचे उत्तरेस प्राधिकरणाला दिलेल्या जमीनीपैकी काही जमीन छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी परत करणे**

या बाबीवर विचार विमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.१५ : रावळी, वडाळा येथे निम्नस्तर जलाशय व उदंचन केंद्र यांचे बांधकाम करण्यासाठी वडाळा क्षेत्रातील ३.५ हेक्टर जमिनीचे बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरण**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.८२३ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) अन्वये मिळालेल्या आणि त्याबाबतीत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरणाच्या दिनांक २३-३-१९८७ च्या ठराव क्र.३२८ प्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेस निम्नस्तर जलाशय व उदंचन केंद्र यांच्या बांधकामाकरिता ताबा दिलेल्या ३५०० चौरस मीटर भूखंडाच्या

भाडेपट्टयाची दि.४-८-१९८७ ते १५-६-२००० या कालावधीची रक्कम रुपये १,६९,१८,०२०/- (अक्षरी रु.एक कोटी एकोणसत्तर लाख अठरा हजार वीस) व त्यावर १५% वरकड खर्च आणि १५% व्याज मिळून एकूण रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मागणी करण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर रक्कम प्राधिकरणाकडे भरल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम,१९७७ च्या तत्कालीन तरतुदीप्रमाणे सदर विनियमाच्या जोडपत्र-ड प्रमाणे भाडेपट्टा करार व जोडपत्र-इ प्रमाणे भाडेपट्टा विलेख करण्यास व त्यासाठी सदर जोडपत्रांच्या नमुन्यात योग्य ते बदल करण्यास, तसेच भाडेपट्टा करार व भाडेपट्टा विलेख पूर्ण झाल्यावर संबंधित भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या नावे करण्यासाठी अधिक्षक भूमि अभिलेख, मुंबई शहर यांना ना हरकत दाखला देण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकरण याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.१६ : मंत्रालयाच्या आधुनिकीकरणासाठी रु.१०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

१६.१ ही बाब बैठकीपुढे सादर करताना याबाबत शासनाकडून निधीची रक्कम व त्याचे स्वरुप (कर्ज किंवा ठेव) याबाबत कोणताही प्रस्ताव प्राधिकरणास प्राप्त झाला नसल्याचे, तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमातील तरतूदी प्रमाणे विषयांकीत कामासाठी शासनास कर्जाऊ रक्कम देता येत नाही व जरुर असलेला निधी ठेव रुपाने हवा असल्यास त्याबाबतचे अधिकार कार्यकारी समितीस आहेत असे निदर्शनास आणण्यात आले.

१६.२ विषयांकीत कामासंबंधी व लागणा-या निधीसंबंधी शासन स्तरावर अजून निर्णय झाला नसल्याने या कामासाठी निधी रु.१०० कोटी इतका उपलब्ध करुन देण्यास प्राधिकरणाने तत्वतः मंजूरी द्यावी असे मुख्य सचिव यांनी प्रतिपादन केले. प्राधिकरणाकडून निधीची गरज असल्यास शासन योग्यवेळी प्रस्ताव पाठविल असेही सांगण्यात आले.

१६.३ शासनास विषयांकीत कामासाठी रु.१०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्याचे त्याप्रमाणे तत्वतः मान्य करण्यात आले.

**<u>बाब क्र.१७</u> : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम १९९८ मधील ५व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत <u>वेतनश्रेणी लागू करणेबाबत</u>**

१७.१ विषयांकीत बाब बैठकीसमोर सादर करताना या विषयावर दि. २९ जुलै, १९९९ रोजी एक पुरवणी टिप्पणी प्राधिकरणाच्या सदस्यांच्या विचारार्थ पाठविल्याचे निदर्शनास आणण्यात आले. सदर टिप्पणीत खालील बाबींचा समावेश होता :-

(१) प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी याना दि.१/१/१९९६ पासून पूर्वलक्षी प्रभावासह ५ व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी तसेच इतर भत्ते लागू करण्यास नगर विकास विभागाचे पत्र क्र.संकीर्ण-१०९९/२७४/प्र.क्र.२३/९९/नवि-१०, दि.९ जुलै, १९९९ प्रमाणे, शासनाने मान्यता दिली व त्या संदर्भात शासनाच्या वित्त विभागाने वेळोवेळी काढलेले आदेश तंतोतंत लागू रहातील असे कळविले,

(२) प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे पगार व भत्ते शासनाचे अधिकारी व कर्मचारी यांचे प्रमाणेच देण्यात येत असल्यामुळे; प्राधिकरणाची बैठक लवकर होण्याचा संभव नसल्यामुळे आणि अधिकारी व कर्मचारी यांच्या संघटनांनी

तगादा लावल्यामुळे सदर प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यासाठी मा.मुख्यमंत्री व प्राधिकरणाचे अध्यक्ष यांची मान्यता घेण्यात आली होती,

(३) शासनाने मंजूरी दिल्यानुसार सुधारित वेतनश्रेणी व इतर भत्ते प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी याना देण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

१७.२ मूळ टिप्पणी व पुरवणी टिप्पणी यांचा विचार करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ८२४ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ११ चे उपकलम (२) तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सेवेच्या शर्ती) विनियम, १९७७ व या बाबत सहाय्यभूत होणा-या इतर अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे खालील बार्बीस कार्योत्तर मान्यता देत आहे आणि त्या संबंधात प्राधिकरणाच्या मा.अध्यक्षांनी केलेल्या कार्यवाहीचे प्राधिकरण अनुसमर्थन करीत आहे :-

(१) महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, १९९८ च्या तरतुदी व बाब टिप्पणीच्या परिशिष्ट-१ मध्ये दर्शविलेल्या वेतनश्रेण्या दि. १ जानेवारी, १९९६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना लागू कराव्यात; आणि

(२) बाब टिप्पणीच्या परिच्छेद ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे घरभाडे भत्ता, स्थानिक पूरक भत्ता, वाहतूक भत्ता व महागाई भत्ता हे शासन निर्णयाप्रमाणे प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना देण्यात यावेत.

" आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीच्या प.१० मध्ये नमूद केलेल्या कारणासाठी, सुधारित वेतनश्रेणी व इतर भत्ते यापोटी दि.१ एप्रिल,१९९६ ते ३० सप्टेंबर,१९९८ या कालावधीतील थकबाकीसुध्दा प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी यांना पुढील कालावधीतील थकबाकीप्रमाणे रोखीत देण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाचे कलम ९ चा वापर करुन, महानगर आयुक्त, प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग, मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार आणि विधी सल्लागार यांचा समावेश असलेली एक समिती प्राधिकरण याद्वारे नेमीत आहे. प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, १९९८ लागू करीत असताना एखाद्या विशिष्ट प्रकरणी गैरवाजवी त्रास होणार असेल तर याद्वारे असे प्रकरण न्याय व सम न्याय दृष्टीने हाताळण्यास आवश्यक वाटेल एवढया मर्यादेपर्यंतच एखादा नियम बाजूला ठेवण्याचे किंवा शिथिल करण्याचे अधिकार प्राधिकरण याद्वारे सदर समितीस प्रदान करीत आहे. सदर समितीचा निर्णय निर्णायक व अंतीम राहील."

**बाब क्र.१८ : महाराष्ट्र शासनास रु.६.५० कोटी ठेव देणेबाबत- विक्रांत नौकेचे समुद्र संग्रहालयामध्ये रुपांतर करण्यासाठीचा खर्च**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.८२५ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, शासनाच्या आदेशानुसार –

(१) विक्रांत ही विमानवाहू नौका भारतीय नौदलाकडून खरेदी करण्यासाठी जरुर

असलेली रुपये ५ कोटीची रक्कम शासनातर्फे भारतीय नौदलास प्राधिकरणाने अदा केली त्यास याद्वारे कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे; आणि

(२) सदर विक्रांत या विमानवाहू नौकेचे समुद्र संग्रहालयामध्ये रुपांतर करण्याच्या बाबतीत प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी टाटा कन्सलटन्सी इंजिनिअरींग प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीस द्यावी लागणारी फी अदा करण्यासाठी आणखी रुपये १.५० कोटीची रक्कम ठेव रुपाने राज्य शासनाकडे ठेवण्यास किंवा राज्य शासनाच्या निदेशाप्रमाणे ती अदा करण्यास प्राधिकरण याद्वारे मंजूरी देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, वरील दोन्ही ठेवी प्राधिकरणाच्या लेख्यात शासनाकडे ठेवलेल्या ठेवी म्हणून दाखवाव्यात, त्याचा कालावधी १ वर्षाचा असेल, त्यावर १२% दराने व्याज शासनास द्यावे लागेल व १ वर्षानंतर सदर रक्कम व्याजासह शासनाने परत करावी. वरील दोन्ही ठेवीस प्राधिकरणाच्या ठेवीबाबतच्या इतर अटी व शर्तीही लागू राहतील.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.१९</u> : **कापुरबावडी उड्डाणपुलाचे बांधकामामुळे विस्थापित झालेल्या लोकांचे पुनर्वसन करण्याकरिता ठाणे महानगरपालिकेने मागणी केल्याप्रमाणे प्राधिकरणाचे मालकीची मौजे चितळसर-मानपाडा येथील गट क्र.४१/१ पैकी व ४१/३ पैकी २६,१५१.०३ चौ.मीटरचा भूखंड कायम स्वरुपी त्यांना मंजूर करणे.**

ठाणे महानगरपालिकेची निकड लक्षात घेऊन मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष प्राधिकरण यांनी विषयांकित भूखंडाचा आगाऊ ताबा ठाणे महानगरपालिकेस देण्यास मान्यता

दिल्याबद्दल, श्री.वसंत डावखरे यांनी ठाणे महानगरपालिका व ठाण्याचे नागरीक यांच्या वतीने मा.मुख्यमंत्री व प्राधिकरणाचे अध्यक्ष यांचे आभार मानले.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ८२६ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाच्या कलम ३ चे पोटकलम (२) तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ चा नियम १५ आणि या बाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरणाच्या मालकीची मौजे-चितळसर-मानपाडा येथील गट क्र.४१/१ पैकी व ४१/३ पैकी २६१५१.०३ चौरस मीटर आकाराचा भूखंड ठाणे महानगरपालिकेस त्यांच्या सुधार कार्यक्रमामुळे विस्थापित होणा-या व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी, जी किंमत शहर विकास मुल्यांकन अधिकारी ठरविल ती किंमत ठाणे महानगरपालिका प्राधिकरणास देईल या अटीवर, कायम स्वरुपाने देण्यास प्राधिकरण याद्वारे कार्योत्तर मंजूरी देत आहे व जमिनीची किंमत ठरल्यावर याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची महानगर आयुक्तांना विनंती करीत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, ठाणे महानगरपालिकेची निकड लक्षात घेऊन मा.अध्यक्षांच्या मान्यतेने सदर भूखंडाचा ताबा ठाणे महानगरपालिकेस देण्यात आला त्या कार्यवाहीचे प्राधिकरण याद्वारे अनुसमर्थन करीत आहे."

**बाब क्र.२० : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील ३००० चौरस मीटर क्षेत्राचा भूखंड पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांना पोलीस स्टेशनकरीता देणे.**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ८२७ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम ३ चे पोट कलम (२), तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारीत) आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील ४५ मीटर रुंद वांद्रे-कुर्ला जोडरस्त्यावरील आय.सी.आय.सी.आय. कार्यालयाचे समोरील, ३००० चौरस मीटर क्षेत्राचा (बांधकाम परिबध्द क्षेत्र ३८२५ चौरस मीटर) भूखंड राज्य शासनाचे गृह विभागास, राज्य शासन ठरविल त्या अधिमूल्याने ८० वर्षाचे भाडेपट्टयावर देण्यास प्राधिकरण याद्वारे प्रस्ताविल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारीत) मधील भाडेपट्टा विलेख (नमुना-ड) मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करणे व पोलिस आयुक्त बृहन्मुंबई अथवा शासन, गृह विभाग, मंत्रालय यांचे बरोबर भाडेपट्टा विलेख पूर्ण करणे व मंजूर ठरावानुसार त्याची अंमलबजावणी करणेकरीता महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२१ : कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६च्या कलम २६अन्वये प्रसिध्दीकरण करण्यासाठी मुदतवाढ**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ८२८ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ च्या कलम २६ अन्वये कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी प्रारुप विकास योजना तयार करुन प्रसिध्द करण्यासाठी दिनांक ५ जुलै,१९९९ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी मुदत वाढ मागण्यासाठी शासनास अर्ज करण्यास प्राधिकरण याद्वारे मंजूरी देत आहे. तसेच सदर अर्ज व इतर पत्रव्यवहार करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.२२ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-२ (एमयुटीपी-२) साठी प्रकल्प व्यवस्थापन पथकातील प्रकल्प संचालक हे पद निर्माण करणे.**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ८२९ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात मुंबई नागरी परिवहन

प्रकल्प-२ (एमयुटीपी-२) साठीच्या प्रकल्प व्यवस्थापन पथकातील, प्रकल्प संचालक हे पद, रु.१८४०० ते २२४०० या वेतनश्रेणीत निर्माण करण्यास प्रस्ताविल्याप्रमाणे मान्यता देत आहे.तसेच या वेतनश्रेणीसाठी अनुज्ञेय असलेले भत्ते व इतर सुविधा या पदास प्रस्तावित केल्याप्रमाणे लागू करण्यासही प्राधिकरण मान्यता देत आहे."

**बाब क्र.२३ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-२ व मुंबई नागरी पुनर्वसन प्रकल्प कार्यान्वित करणे तसेच त्या संबंधीची प्रारंभिक कामे आणि हे प्रकल्प सुरु झाल्यावर संबंधित सर्व कामे पार पाडण्यासाठी प्राधिकरणाच्या कार्यालयामध्ये करावयाची व्यवस्था**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ८३० :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ११ चे पोटकलम (२) प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीतील खालील प्रस्तावाना सुचविल्याप्रमाणे मंजूरी देत आहे :-

(१) प्राधिकरणातील प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदाच्या पदनामामध्ये बदल करुन त्याचे सुधारीत पदनाम "प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग" असे करावे;

(२) श्री.वि.कृ.फाटक यांना त्यांच्या मुळ (असुधारीत) पगाराच्या १०% एवढी रक्कम विशेष वेतन म्हणून द्यावी; आणि

(३) वरील १ व २ मधील नमूद केलेली व्यवस्था दिनांक १५ मार्च,१९९९ पासून अंमलात आली असे मानण्यात यावे व ही व्यवस्था श्री.फाटक हे प्राधिकरणामध्ये विभाग प्रमुखाचे पद धारण करीत असेपर्यंत अस्तित्वात राहील.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, या प्रस्तावास राज्य शासनाच्या मंजूरीची जरुरी असल्यास ती मिळवून ठरावाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना याद्वारे देण्यात येत आहेत."

त्यानंतर मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

*********************

जोडपत्रे

जोडपत्र-१

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची ९६ वी बैठक

दिनांक : ३ ऑगस्ट, १९९९

: ठराव :

"श्री.रमानाथ झा यांनी या प्राधिकरणाचे सदस्य-सचिव आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त या नात्याने दिनांक ०८.०५.१९९८ पासून दिनांक ०९.०२.१९९९ पर्यंत केलेल्या कार्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण गौरवपूर्ण उल्लेख करीत आहे. श्री.रमानाथ झा यांना त्यांचा भावी सेवा काळ उज्वलशील जावो अशी सदिच्छा हे प्राधिकरण व्यक्त करीत आहे."

************

जोडपत्र-२

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची ९६ वी बैठक

दिनांक : ३ ऑगस्ट, १९९९

: ठ रा व :

"श्री.मन मोहन सिंह यांनी या प्राधिकरणाचे सदस्य-सचिव आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त या नात्याने दिनांक १०.०२.१९९९ पासून दिनांक १३.०६.१९९९ पर्यंत केलेल्या कार्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण गौरवपूर्ण उलेख करीत आहे. श्री.मन मोहन सिंह यांना त्यांचा भावी सेवा काळ उज्वलशील जावो अशी सदिच्छा हे प्राधिकरण व्यक्त करीत आहे."

************

जोडपत्र-३

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची ९६ वी बैठक

दिनांक : ३ ऑगस्ट, १९९९

: ठ रा व :

"श्री.वि.ग. उर्फ बाळ धारप, माजी नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दिनांक ४ डिसेंबर, १९९८ रोजी निधन झाले. श्री.धारप हे १९८०-८१ सालात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्षही होते. श्री.धारप हे दिनांक ०८.०१.१९७९ ते दिनांक १९.०५.१९८३ या कालावधीत प्राधिकरणाचे सदस्य होते. तसेच दिनांक २६.०६.१९७९ ते दिनांक १९.०५.१९८३ या कालावधीत ते प्राधिकरणाच्या त्यावेळच्या स्थायी समितीचे सदस्य होते. या काळात श्री.धारप यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद आणि आकस्मिक निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

"या ठरावाची प्रत दिवंगत श्री.धारप यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात हे प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

***********

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची ९६ वी बैठक

**दिनांक : ३ ऑगस्ट, १९९९**

**: ठराव :**

"श्री.रत्नाप्पा कुंभार, महाराष्ट्राचे माजी नगर विकास मंत्री यांचे दिनांक २३ डिसेंबर, १९९८ रोजी निधन झाले. श्री.कुंभार हे दिनांक २३.०४.१९७७ ते दिनांक ११.०३.१९७८ या कालावधीत प्राधिकरणाचे तसेच प्राधिकरणाच्या त्यावेळच्या स्थायी समितीचे अध्यक्ष होते. या काळात श्री.कुंभार यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद आणि आकस्मिक निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

"या ठरावाची प्रत दिवंगत श्री.कुंभार यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात हे प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

**************

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची ९६ वी बैठक

दिनांक : ३ ऑगस्ट, १९९९

: ठ रा व :

"श्री.शरद आचार्य, मुंबईचे माजी महापौर यांचे दिनांक २५ मार्च, १९९९ रोजी निधन झाले. श्री.आचार्य हे दिनांक ०४.०४.१९८९ ते दिनांक ०१.०४.१९९० या कालावधीत मुंबईचे महापौर या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात श्री.आचार्य यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद आणि आकस्मिक निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

"या ठरावाची प्रत दिवंगत श्री.आचार्य यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात हे प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

*************